जा.क्र.पाजिप/ग्रापं/कार्या- ०२ /वशी १६३ /२०२६ दिनांक:-२६ /०२/२०२६

प्रति,

१. श्री.गणेश विष्णू दळवी, मु.पो.धुंदळवाडी, ता.डहाणू
२. श्री.गणेश हरिश्चंद्र पवार, मु.जयेश्वर, पो.शिरोशी, ता.जव्हार
३. श्री.ऋषिकेश महादेव चौधरी, मु.पो.गजानन कॉलनी मोखाडा, ता.मोखाडा
४. श्री.राहुल रमेश बोरसा, रा.गडचिंचले, पो.दाभाडी, ता.डहाणू
५. श्रीम.अलका शंकर गावित, .पो.धुंदळवाडी, ता.डहाणू
६. श्री.नितेश सखाराम टोकरे, मु.पो.दापचरी, ता.डहाणू
७. श्री.महेश तुकाराम दळवी, रा.पाटबंधारे कॉलनी, ता.वाडा
८. श्री.जयेश नरेश दौडा, मु.दिवाणपाडा,पो.गंजाड, ता.डहाणू
९. श्री.सुरज गणेश जाधव, मु.आंबेघर,पो.सुकसाळे, ता.विक्रमगड
१०. श्रीम.संजीवनी बाळकृष्ण वाडु, मु.पो.नरपड, ता.डहाणू
११. श्रीम.निकिता रमेश मेघा, मु.पो.कासा, ता.डहाणू
१२. श्रीम.निलम दशरथ मेरे, मु.पो.कुर्झे, ता.विक्रमगड
१३. श्रीम.अक्षया रामचंद्र दयात, मु.पो.मेट, ता.वाडा
१४. श्रीम.प्रगती प्रकाश बोरसे, मु.नितीननगर विक्रमगड, ता.विक्रमगड
१५. श्रीम.भाग्यश्री देविदास बोरसे, मु.पो.ओंदे, ता.विक्रमगड
१६. श्री.सागर देवराम टोपले, मु.पो.गारगाव, टोपलेपाडा,ता.वाडा
१७. श्री.हितेश मंगेश दळवी, मु.पो.शिवाजीनगर, ता.वाडा
१८. श्री.विजय भाऊ भोये,मु.पो.कासा, ता.विक्रमगड

**विषय :- जिल्हा परिषद, पालघर अंतर्गत सरळसेवेने कंत्राटी ग्रामसेवक (पेसा) या पदावर नियुक्ती देणेबाबत.**

**संदर्भ :-** १) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी २०२३/प्र.क्र.५४/आरक्षण५/ दि.५ ऑक्टोंबर २०२४

२) इंस्टीटयुट ऑफ बैंकिंग पर्सनल सिलेक्शन, यांचे पत्र क्र. २६०८ दि.१२.०९.२०२४

३) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी-२०२३/प्र.क्र.५४/आरक्षण ५/ दि.११ फेब्रुवारी २०२६

सामान्य प्रशासन विभागाकडील संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) १७ संवर्गातील सरळसेवेची पदे मानधन तत्वावर नेमणुका करुन रिक्त पदे तातडीने भरण्याकरीता आदेश निर्गमित केलेले होते. त्यानुसार अनुसूचित क्षेत्रातील ( पेसा ) पदे भरण्यासाठी जाहिरातीद्वारे निवड प्रक्रिया राबविण्यात

आलेल्या प्रक्रियेमध्ये गुणवत्तेने पात्र ठरलेल्या उमेदवारांची विशेष बाब म्हणुन मानधन तत्वावर नेमणुक करण्यास संवर्ग निहाय प्रशासकिय विभागांना परवानगी देण्यात आलेली होती.

जिल्हा परिषद, पालघर सरळसेवा भरती सन २०२३ मधील मानधन तत्वावर नियुक्ती करावयाचे कंत्राटी ग्रामसेवक (पेसा) संवर्गासाठी गुणवत्तेनुसार संदर्भ क्र.२ नुसार प्राप्त झालेल्या यादीमधुन तात्पुरती निवड/ प्रतिक्षा यादी तयार करण्यात आली होती. कागदपत्र पडताळणी अंती आपणांस मानधन तत्वावर नियुक्ती करावयाचे कंत्राटी ग्रामसेवक (पेसा) या पदासाठी नियुक्ती देण्यात आलेली होती. मात्र वरीलपैकी काही उमेदवार नेमणुकांच्या ठिकाणी हजर झालेले नाहीत तसेच काही उमेदवारांनी नियुक्तीच्या ठिकाणी हजर होऊन राजीनामा दिलेला आहे.

सामान्य प्रशासन विभागाकडील दि.११ फेब्रुवारी २०२६ च्या संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयातील मुद्दा क्र.६ मध्ये पेसा क्षेत्रातील रिक्त पदांसाठी पदभरती प्रक्रिया राबवितांना पदभरतीसाठी यापूर्वी जाहिरातीद्वारे राबविलेल्या निवडप्रक्रियेमध्ये गुणवत्तेने पात्र ठरलेल्या निवड यादीतील उमेदवारांच्या तसेच दिनांक ०५.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मानधन तत्वावर नियुक्ती दिलेल्या उमेदवारांच्या गुणवत्तेनुसार नियुक्तीची कार्यवाही प्रथम करण्यात यावी असे नमुद केलेले आहे.

त्याअनुषंगाने आपणांस कंत्राटी ग्रामसेवक (पेसा) या पदावर नेमणुका दयावयाच्या प्रस्तावित आहेत. तरी कंत्राटी ग्रामसेवक (पेसा) या पदावरची नेमणुक आपण स्विकारणार आहात किंवा नाही याबाबत आपले लेखी स्वरुपात म्हणणे सादर करण्यासाठी दिनांक ०२ /०३ / २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता तळमजला रुम नं.६, ग्रामपंचायत विभाग (मुख्यालय), जिल्हा परिषद पालघर येथे उपस्थित राहावे. सदर दिवशी आपण गैरहजर राहिल्यास आपणांस कंत्राटी ग्रामसेवक (पेसा) या पदावर नेमणुक स्विकारावयाची नाही असे गृहित धरणेत येऊन आपली निवड प्रक्रिया रद्द करण्यात येईल. तसेच निवड प्रक्रियेसंबंधात आपणांस कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही किंवा हक्क सांगता येणार नाही याची नोंद घ्यावी.

**मनोज रानडे (भा.प्र.से)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,पालघर**

प्रत:- मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती यांना माहितीसाठी सादर.